महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १०/एनजीपी/पदविका/२०२०/ ५११

दिनांक : 11 AUG 2020

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीभुत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत...

संदर्भ: संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक : २अ/एडीएम/२०२०/१८८, दिनांक : ३०.७.२०२०.

उपरोक्त विषयाबाबत संचालनालयाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकियेकरिता सहभागी संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेशक्षमतेबाबतची माहिती संबंधीत संस्थांनी शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधीत विद्यापीठांकडून/ परिक्षा मंडळाकडून संलग्नीकरण प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन दिनांक ५.८.२०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन सादर करण्याबाबत व संबंधीत तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांनी दिनांक १०.८.२०२० पर्यंत पडताळणी करुन सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. तथापि, दिनांक १०.८.२०२० रोजी सदर माहितीचे संचालनालय स्तरावर अवलोकन केले असता कमी संस्थांनी माहिती सादर केल्याचे निदर्शनास आलेले आहे. याबाबत मा. संचालकांनी नाराजी व्यक्त केलेली आहे.

तरी, सदर माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने ज्या संस्थांच्या अभ्यासक्रमांच्या नावात / अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत संबंधीत शिखर परिषदांनी बदल केलेल्या संस्था वगळता उर्वरित संस्थांनी तात्काळ माहिती ऑनलाईन पध्दतीने या संचालनालयास सादर करावी.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.